जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 NOV 2024
लोकमत



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी मान्यवर उपस्थित होते.

# विद्यापीठात इंदिरा गांधी जयंती

## प्रतिमेस अभिवादन : एकतेची घेतली शपथ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मंगळवारी भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी अहिंसा व एकतेची शपथ घेण्यात आली. याप्रसंगी मिड स्वीडन विद्यापीठाचे प्रा. मॅग्नस् हयुमेलगार्ड, संशोधक डॉ. मनीषा फडतारे, डॉ. रोहन पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, राष्ट्रीय सेवायोजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. कैलास सोनवणे, आयक्यूएसी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. प्रवीणकुमार पाटील, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 NOV 2024
सकाळ

# इंदिरा गांधी यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अहिंसा व एकतेची शपथ घेण्यात आली. मिड स्विडन विद्यापीठाचे प्रा. मॅग्नस् ह्युमेलगार्ड, संशोधक डॉ. मनीषा फडतारे, डॉ. रोहन पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. कैलास सोनवणे, आयक्यूएसी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, तंत्रज्ञान अधिविभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रवीणकुमार पाटील, डॉ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 NOV 2024
तरुण भारत

# माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. प्राटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. अहिंसा व एकतेची शपथ घेण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ.सुहासिनी पाटील, डॉ. अजितसिंह जाधव, प्रा.मॅग्नस् ह्युमेलगार्ड, डॉ.मनिषा फडतारे, डॉ. रोहन पाटील, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ.महादेव देशमुख, डॉ.सरिताठकार, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. सागर डेळेकर, डॉ.नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. प्रविणकुमार पाटील, डॉ. धनंजय सुतार आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 NOV 2024
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात इंदिरा गांधी जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात देशाच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये मंगळवारी सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अहिंसा व एकतेची शपथ घेण्यात आली. याप्रसंगी मिड स्वीडन विद्यापीठाचे प्रा. मॅग्नस ह्युमेल गार्ड, संशोधक डॉ. मनीषा फडतारे, डॉ. रोहन पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. तानाजी चौगुले, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. प्रवीणकुमार पाटील, डॉ. धनंजय सुतार यांच्यासह संशोधक विद्यार्थी, अधिकारी व प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

20 NOV 2024 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जीवरसायनशास्त्र, मराठी ठरले उत्कृष्ट अधिविभाग



आदर्श शिक्षिका पुरस्कार स्वीकारताना डॉ. अंजली राजेंद्र पाटील.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातर्फे वर्धापनदिनी दिला जाणारा उत्कृष्ट अधिविभागांसाठीचा पुरस्कार जीवरसायनशास्त्र आणि मराठी अधिविभाग यांना देण्यात आला. विज्ञान व तंत्रज्ञान आणि सामाजिक शास्त्रे असे दोन गट करून मूल्यमापनाअंती पुरस्कार देण्यात येतो. पुरस्कारप्राप्त विभागास दहा लाख रुपये, प्रमाणपत्र आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा प्रदान करण्यात आला.

यावेळी विद्यापीठातील गुणवंत शिक्षकांचा पुरस्कार इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील यांना, तर बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार पलूस (जि. सांगली) येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या डॉ. पोपट पाटील यांना, तर स्व. प्राचार्या सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार राजाराम महाविद्यालयातील डॉ. अंजली पाटील यांना प्रदान करण्यात आला.

त्याचबरोबर विद्यापीठातील गुणवंत प्रशासकीय सेवक : डॉ. प्रल्हाद बाबूराव जाखले, सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग, सुनील जयवंत देसाई, अधीक्षक, पी. जी. बिल्स विभाग, गणपती मस्ती, मेस्त्री, तात्यासो करपे, हवालदार.

गुणवंत प्राचार्य : डॉ. शिवलिंग मेनकुदळे. गुणवंत शिक्षक : डॉ. राजेश निमट. गुणवंत सेवक : धनाजी पाटील, मोहन माने.

## 'नॅक' मानांकित महाविद्यालयांचा गौरव

'नॅक'चे 'अ+' आणि 'अ' मानांकन मिळवणाऱ्या संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा समारंभात सत्कार करण्यात आला. यामध्ये वालचंद कॉलेज ऑफ इंजि. (सांगली), यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय (वारणानगर), भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजि. व राजाराम कॉलेज (कोल्हापूर), अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसी (पेठवडगाव), वासंतीदेवी पाटील इन्स्टि. ऑफ फार्मसी (कोडोली, पन्हाळा), सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय (सातारा), आदर्श कॉलेज (विटा), डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय (सांगलीवाडी), लालबहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स (सातारा), मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय (सांगली), भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ फार्मसी (कोल्हापूर), श्री अण्णासाहेब डांगे आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स (हातकणंगले), राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी (कासेगाव), यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स (कराड), राजे रामराव महाविद्यालय (जत), विवेकानंद महाविद्यालय (कोल्हापूर) आणि शहाजी लॉ कॉलेज (कोल्हापूर) या महाविद्यालयांचा समावेश आहे.

20 NOV 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन कौतुकास्पद

## कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी : शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा वर्धापनदिन उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने आपल्या परिक्षेत्रातील ग्रामीण भागातील घराघरांत शिक्षणाची गंगा प्रवाहित करण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्याचप्रमाणे संशोधनाच्या क्षेत्रातही आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटवला आहे. शिवाजी विद्यापीठाची ही कामगिरी कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी काढले. शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या वर्धापन दिन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. गोसावी म्हणाले, गेल्या ६२ वर्षांमध्ये शिवाजी विद्यापीठाने या विभागाच्या शैक्षणिक व संशोधकीय विकासासाठी मोलाचे कार्य केले आहे. येथील विविध विद्याशाखांमध्ये सुरू असलेल्या संशोधन कार्याचा ठसा केवळ राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटवला गेला आहे. जलसंवर्धनासह सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून विद्यापीठ राबवत असलेले अनेक उपक्रम पथदर्शी स्वरूपाचे आहेत.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने अंमलात आणले आहे. विद्यापीठाने देश-विदेशांतील प्रथितयश संस्थांसमवेत सामंजस्य करार केले आहेत.

तत्पूर्वी, विद्यापीठाच्या प्रांगणात प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते शिवपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजास वंदन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सागर डेळेकर आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथाचे प्रकाशन करताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी व विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आदी.

### 'हीरकमहोत्सवी शिवाजी विद्यापीठ' ग्रंथाचे प्रकाशन

शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासून म्हणजे सन १९६२ ते २०२१ या साठ वर्षांच्या कालावधीतील वाटचालीचा आढावा घेणाऱ्या 'हीरकमहोत्सवी शिवाजी विद्यापीठ' या ग्रंथाचे प्रकाशन यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रंथाचे मुख्य संपादक डॉ. भालबा विभूते यांच्यासह इतिहास लेखन समितीचे सदस्य डॉ. टी. एस. पाटील, डॉ. इस्माईल पठाण यांचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दिवंगत समिती सदस्य ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांच्या योगदानाचा कुलगुरू डॉ. शिर्के आणि डॉ. विभूते यांनी आवर्जून उल्लेख केला.

### राजर्षी शाहूंचा सर्वदूर प्रभाव

कोल्हापूरच्या मातीला, माणसांना स्वत:चा एक पोत, अभिमान आणि संस्कृती आहे. या संस्कृतीला आपल्या द्रष्टेपणाने राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सर्वदूर महत्त्व प्राप्त करून दिले. शाहू महाराजांनी समाजाच्या तळागाळातील घटकांपर्यंत शिक्षण पोहोचवले. सव्वाशे वर्षांपूर्वी सामाजिक आरक्षणाचा निर्णय घेतला. इथल्या सामाजिक चळवळींना बळ दिले. सत्यशोधक चळवळीचे ते शक्तिस्थान होते. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या आशय बदलावर राजर्षी शाहू महाराजांचा प्रचंड प्रभाव असल्याचे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. गोसावी यांनी काढले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 NOV 2024
पुढारी

# विधानसभा निवडणूक मतदानासाठी विद्यापीठास सार्वजनिक सुट्टी जाहीर

**कोल्हापूर :** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक मतदान-२०२४ च्या अनुषंगाने बुधवारी (दि. २०) शिवाजी विद्यापीठाने सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. त्यानुसार विद्यापीठातील प्रशासकीय कार्यालय, सर्व अधिविभाग तसेच सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. याची सर्व अधिविभागप्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, प्राचार्य यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 NOV 2024
तरुण भारत

# विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालय, अधिविभागांना आज सुट्टी

**कोल्हापूर :** विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सर्व अधिविभाग, महाविद्यालयांना आज (दि. २०) सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. ही सुट्टी राज्य शासनाच्या आदेशावरून देण्यात आली आहे, तरी सर्व अधिविभाग, महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी घ्यावी, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 NOV 2024
तरुण भारत

# विद्यापीठ पदवी, पदव्युत्तर परीक्षा २६ नोव्हेंबरपासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर-नोव्हेंबरमधील विधानसभा निवडणुकीमुळे पुढे ढकललेल्या ८५० विषयांच्या परीक्षा मंगळवार २६ नोव्हेंबरपासून सुरु होणार आहेत. ही परीक्षा १ लाख ८५ हजार १९३ विद्यार्थी देणार आहेत, तरी विद्यार्थ्यांनी नियमानुसार परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांची प्रश्नपत्रिका विद्यापीठाने तयार केलेल्या एसआरपीडीच्या माध्यमातून पाठवण्यात येणार आहे. विद्यापीठाने स्वत:ची एसआरपीडी तयार केल्यापासून पहिल्यांदाच सर्व विषयांच्या परीक्षा होत आहेत. महाविद्यालय व अधिविभागातील एसआरपीडी समन्वयकांना एसआरपीडीच्या वापरासंदर्भात प्रशिक्षण दिले आहे. विद्यापीठ प्रशासनाने प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका आणि परीक्षा केंद्रांची तयारी केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 NOV 2024
सकाळ



कंदलगाव : बॉक्सिंग स्पर्धेत निवड झालेले कृष्णकल्प बॉक्सिंग ॲकॅडमीचे विद्यार्थी व प्रशिक्षक.

# विद्यापीठांतर्गत बॉक्सिंग स्पर्धेत 'कृष्णकल्प'चे यश

कंदलगाव, ता. १९ : गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठअतंर्गत कोल्हापूर विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत कृष्णकल्प बॉक्सिंग ॲकॅडमीचे खेळाडू सातारा येथे होणाऱ्या आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी पात्र ठरले.

विजेते असे : प्रथम गट : शुभांगी दुबे ४८-५० किलो, ऋचा पाटील ७५-८१ किलो. द्वितिय गट : आर्य बुधले ५१ ते ५४ किलो. चाणक्य पावसकर ५४ ते ५७ किलो. यश सूर्यवंशी ६७-७१ किलो. तृतीय गट : वरद रोकडे ७१ ते ७५ किलो.

खेळाडूंना कृष्णकल्प बॉक्सिंग व फिटनेस ॲकॅडमीचे प्रशिक्षक ऋतुराज कदम व कोल्हापूर सिटी बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष अमर बागी, सचिव आरती कामटे तसेच सहसचिव मनोज घाटगे यांचे मार्गदर्शन लाभले.